


दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA

vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● सोमवार ४ मार्च २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २०१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा,तालुका,गाव पातळीवर वार्ताहार/पत्रकार/जाहिरातदार प्रतिनिधी नेमणे आहे.

दैनिक वादळ वार्ता

या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.

** पात्रता **

१. समाजसेवेची आवड २. जनसंपर्क ३. स्मार्ट फोन असणे आवश्यक ४. सोशल मीडियाचा वापर करता येणे

संपर्क-९४२२६६००७७

जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.

# अचानक आले थंड वारे, तापमानात घट, राज्यातील वातावरणात का झाला बदल

**बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे आकाश अंशतः ढगाळ राहिले. त्यामुळे मुंबईतील तापमानात घट झाली आहे. कुलाब्यात २३.३ आणि सातांक्रुजमध्ये २४.४ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. राज्याच्या किमान तापमानात घट झाली आहे. पुढील दोन दिवस मुंबई, पुणे शहरात गारवा जाणवण्याचा अंदाज आहे.**

**बईतील तापमानात घट झाली आहे. कुलाब्यात २३.३ आणि सातांक्रुजमध्ये २४.४ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे.**



राज्यात गेल्या आठवड्यापासून वातावरणात बदल झाला आहे. विदर्भ आणि खान्देशात अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली. त्यामुळे शेतातील रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. आता नुकसानीची पंचनामे सुरु झाले आहेत. ४ मार्च रोजी राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. त्यात उत्तरेकडून येणाऱ्या थंड हवेचा झंझावात सक्रिय असल्याने मुंबईसह किनारपट्टीवर थंड वारे वाहत आहेत. तापमानात घट

बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे आकाश अंशतः ढगाळ राहिले. त्यामुळे मुंबईतील तापमानात घट झाली आहे. कुलाब्यात २३.३ आणि सातांक्रुजमध्ये २४.४ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. राज्याच्या किमान तापमानात घट झाली आहे. पुढील दोन दिवस मुंबई, पुणे शहरात गारवा जाणवण्याचा अंदाज आहे.

या ठिकाणी अलर्ट

राज्यात सोमवारी पुन्हा पावसाचा अलर्ट दिला आहे. अकोल, अमरावती, नागपूर, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये पाऊस पडणार आहे. तसेच मुंबई किनारपट्टी आज सोमवारी तुरळक ठिकाणी हलक्या सरी पडण्याचा अंदाजही आहे.

नुकसानीची पाहणी

जळगावातील पारोळा तालुक्यात अवकाळी पाऊस, गारपिटीमुळे मोठ्या प्रमाणावर शेतपीकाचे तसेच फळबागांच्या नुकसान झाले आहे. या नुकसानग्रस्त भागाची राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल भाईदास पाटील यांनी पाहणी केली. या दौऱ्यात मंत्री अनिल पाटील यांनी पारोळा तालुक्यातील हिवरखेडे, मोंढाळे, करंजी, पिंपळभैरव, बहादरपुर, शिरसोदे, शेवगे बु., महाळपुर, कंकराज, भिलाली, कोळपिंप्री, रत्नापिंप्री, शेळावे खु., शेळावे बु. या गावांना भेट दिली, त्या शिवाय अमळनेर तालुक्यातील कन्हेरे, ढेकु, हेडावे येथील शेतात फळबागेत जाऊन नुकसानीची पाहणी केली. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी चर्चा करुन त्यांचे सांत्वन केले तसेच शेतकऱ्यांना धीर दिला. लवकरात लवकर पंचनामे करून नुकसान भरपाई खात्यात जमा करण्याची ग्वाही देखील यावेळी दिली.

### वातावरण अचानक का बदलले

मुंबईसह आणि किनारपट्टीवर दिवसभर आकाश अंशतः ढगाळ राहिल्यामुळे किमान तापमानात घट होऊन मुंबईत गारवा जाणवत आहे. उत्तरेकडून थंड वारे येत आहे. यामुळे मुंबईत सोमवारी पहाटेपासून थंडा वारे वाहू लागले आहे. उत्तर भारतात पश्चिम विक्षोप म्हणजे उत्तरेकडून येणारा थंड हवेचा झंझावात सक्रिय आहे. हा थंड हवेचा प्रवाह अरबी समुद्रावरून वाटचाल करत मुंबईसह किनारपट्टीवर पोहोचला आहे. थंड वाऱ्याने आपल्या सोबत अरबी समुद्रातील बाष्प वाहून आणले आहे. त्यामुळे किनारपट्टीवर थंड वारे वाहत असून, हवेत बाष्पाचे प्रमाण वाढले आहे.

# रमेश गुळभिले बीड लोकसभा लढवणार

वादळवार्ता/केज

लोकसभेच्या निवडणुका तोंडावर असताना सामाजिक कार्यकर्ते ज्येष्ठ पत्रकार व माहिती कार्यकारी अधिकारी संघटनेचे गुळभिले हे निवडणूक लढवणार असून सर्वसामान्यांचे प्रतिनिधित्व करण्यासाठी मी ही निवडणूक लढवत असून सर्व समाजाचा पाठिंबा मिळणार असल्याचे त्यांनी बोलताना सांगितले बीड लोकसभा मतदार संघात लोकसभेची रणधुमाळी वाढत असताना भारतीय जनता पार्टी राष्ट्रवादी कॉंग्रेस व इतर पक्षात निवडणूक लढविण्यासाठी उमेदवार आपली प्रतिष्ठापनाला लावत असताना सर्वसामान्य नागरिकांसाठी रणांगणात उतरणार असून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी लोकसभेत मी प्रयत्न करीन तसेच सध्या चालू असलेले माणसा माणसातलं वातावरण या राजकीय पक्षांनी अतिशय गढूळ करून टाकलेले असून सर्व समाजांना सोबत घेऊन ही निवडणूक मी लढत असून माझ्यासोबत सर्व संघटना सर्व जातीय संघटना धार्मिक संघटना याचबरोबर सामाजिक संघटना माझ्यासोबत आहेत हे त्यांनी आवर्जून सांगितले असून राजकारणात भारतीय जनता पार्टी शिवसेना राष्ट्रवादी कॉंग्रेस कॉंग्रेस व इतर पक्ष हे आपले मतासाठी सर्वसामान्य जनतेत तेढ निर्माण करून विनाकारण असंतोष निर्माण करत आहेत सर्वसामान्यांचे प्रश्न बाजूला ठेवून फक्त राजकारण करण्यात हे पक्ष गुंतलेले असल्यामुळे मी लोकसभा निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला आहे बीड जिल्ह्यातल्या सर्व मित्र परिवारासोबत चर्चा केली असून त्यांनी लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी सहकार्य करणार असल्याचे सांगितले माझ्यासोबत तन-मन-धनाने बीड जिल्ह्यातील



प्रत्येक गावातील सर्वसामान्य नागरिक सोबत असल्याचे रमेश सांगितले सर्वसामान्य लोकांच्या मूलभूत गरजा स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतर ही तशाच आहेत शेतकऱ्यांचे प्रश्न शैक्षणिक प्रश्न व्यावसायिक प्रश्न बेरोजगारी या सर्व विषयावर मी काम करणार असून बीड जिल्ह्याची ओळख हे लघु उद्योगासाठी तयार करणार व बीड जिल्हा हा जागतिक पातळीवर व्यावसायिक हब म्हणून निर्माण करणार असल्याचे बोलताना त्यांनी सांगितले

## धारूर येथे रविवारी होणाऱ्या तिसऱ्या बौद्ध धम्म परिषदेस हजारोच्या संख्येने उपस्थित रहा :-डॉ जितेंद्र ओव्हाळ .

**वादळवार्ता/किल्ले धारूर**

धारूर येथे दि.३ मार्च रविवार रोजी येथील मोंढा मैदान या ठिकाणी तिसऱ्या बौध्द धम्म परिषदेचे आयोजन केले असल्याची माहिती डॉ बाबासाहेब आंबेडकर विकास मंच अध्यक्ष डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी शनिवारी प्रसिद्धी पत्रकामार्फत दिली आहे.



याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात डॉ. जितेंद्र ओव्हाळ यांनी सांगितले की ,या पूर्वी दोन बौध्द धम्म परिषदा यशस्वीरित्या पार पडल्या ,तालुक्यात बौध्दमय वातावरण निर्माण होऊन घराघरात तथागत गौतम बुद्ध यांचे प्रेरणादाई विचाराचा प्रचार प्रसार करण्यासाठी या धम्म परिषद आयोजित केली असल्याची माहिती डॉ जितेंद्र ओव्हाळ यांनी दिली असून या परिषदेस भदनंत डॉ खेमधमो महाथेरो यांच्या सह भदनंत शरणानंद महाथेरो भदनंत शिवली धम्म देसणा देणार आहेत तसेच प्रमुख मार्गदर्शन डॉ राजरत्न आंबेडकर हे करणार आहेत. या साठी तालुक्यातील धम्मप्रेमी बांधवानी धारूर येथील मोंढा मैदान येथे दि.३ मार्च रविवार रोजी होत असलेल्या तिसऱ्या बौध्द धम्म परिषदेस हजारो च्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ जितेंद्र ओव्हाळ ,सनी गायसमुद्रे ,राकेश शिरसाठ ,अनिल गायकवाड , श्रीपती ओव्हाळ, महेंद्र गायसमुद्रे, अमोल शिरसट, तुषार भालेराव, महेश शिरसट, रवी गायसमुद्रे यांनी केले आहे.

# शिक्षिका शर्मिला महेंद्र गावंड राज्य स्तरीय नारी सन्मान पुरस्काराने सन्मानित.

**उरण/विठ्ठल ममताबादे**

स्टेट वूनोवेशन अँड रिसर्च फाऊंडेशन अर्थात सर फाऊंडेशन यांच्या वतीने राज्यस्तरीय नारी शक्ती सन्मान सोहळा सोलापूर येथे आयोजित केला गेला. प्रत्येक जिल्ह्यातून एक अशा ३५ महिलांचा सन्मान या कार्यक्रमाच्या निमित्ताने करण्यात आला.शैक्षणिक क्षेत्रात वेगवेगळ्या उपक्रमात सहभाग घेवून अध्यापन करणाऱ्या तसेच ,शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती करून अध्यापन सोपे करून मुलांच्यात आनंद निर्माण करणाऱ्या होतकरू महिलांचा सन्मान या कार्यक्रमाच्या निमित्ताने केला गेला .या मध्ये रायगड जिल्ह्यातून उरण तालुक्यातून शर्मिला महेंद्र गावंड यांना सन्मानित करण्यात आले.कोरोना काळापासून त्यांनी विद्यार्थ्यांच्या साठी वेगवेगळे उपक्रम राबवून व्हिडिओच्या माध्यमातून स्वत:च्या युट्यूबच्या माध्यमातून आनंददायी शिक्षण देण्याचं काम या माध्यमातून केले.शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या या आदर्श कार्याची दखल घेत त्यांना द्रोणगिरी युवा पुरस्कार, शिक्षक परिषदेच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार, शिक्षक संघ उरण च्या वतीने आदर्श शिक्षिका पुरस्कार असे विविध पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.सोलापूर येथे झालेल्या राज्य स्तरीय नारी सन्मान पुरस्कार सोहळ्यात शर्मिला गावंड यांना राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजी नगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी , सोलापूरचे मनपा आयूक्त शीतल वुगले - तेली , डॉ. सुहासिनी शहा, श्रीम भाग्यश्री बिले क्रीडा अधिकारी यांच्या उपस्थितीत हा सोहळा सोलापूर येथील किर्लोस्कर सभागृह हिराचंद नेमचंद वाचनालय येथे मोठया उत्साहात उत्तम प्रतिसादात संपन्न झाला.रायगड जिल्ह्यातून एकमेव उमेदवार असलेल्या शर्मिला महेंद्र गावंड यांना राज्यस्तरीय नारी सन्मान पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## संपादकीय

# प्रेरक व्यक्तीचित्रण : नर्मदाकाठची माणसे

विविध कवींनी नद्यांची स्तोत्रे गायिलेली आहेत. जगन्नाथ पंडिताने गंगालहरीमधून गंगेला आळविले. एकेका श्लोकासोबत गंगा एकेक पायरी वर चढली आणि जगन्नाथाचा उद्धार केला. शंकराचार्यांनी नर्मदाष्टकाच्या माध्यमातून माता नर्मदेबाबतचा भक्तीभाव व्यक्त केलेला आहे. कित्येकांनी आपलं आयुष्य नदीकिनारी घालविलेले आहे. नदीकाठच्या लोकांचं जीवन निर्मळ आणि पवित्र बनविण्यासाठी जीवन वाहून घेतले आहे. अशाच देवी नर्मदेविषयी अपार श्रध्दाभाव बाळगून आपल्या जीवनयज्ञाची समिधा नर्मदेच्या भक्तीकुंडात अर्पण करणार्या नर्मदेच्या लेकरांची व्यक्तीचित्रे प्रतिभावान युवालेखक सुनिल पांडे यांनी 'नर्मदाकाठची माणसे' या ग्रंथात रेखाटली आहेत.

लिहिणारा कोणी त्रयस्थ व्यक्ती असेल, तर त्या लिखाणात एक प्रकारचा कोरडेपणा येतो. परंतु सुनील पांडे स्वत:ला नर्मदेचा पुत्र म्हणवतात. त्यामुळे पुस्तक वाचताना त्यांच्या शब्दांत स्वाभाविक आपुलकीचा जिव्हाळा जाणवतो. एका आंतरिक ओलाव्याने भरलेलं आणि भारलेलं व्यक्तीचित्रण म्हणजे सुनिल पांडे लिखित 'नर्मदाकाठची माणसे' हा ग्रंथ. आदि शंकराचार्यांपासून ते एका बस स्टॅंडवर एका अनोळखी प्रवाशाला मदत करणार्या दिलखुलास अल्लड नर्मदेच्या लेकीपर्यंत असणारा विविधरंगी नर्मदा भक्तांचा जीवनपट या ग्रंथातून उलगडत जातो.

भक्त म्हटले की, आपल्या डोक्यात एक ठराविक कल्पना असते. तशी ही व्यक्तीचित्रणे नाहीत. सुरूवातीलाच 'सौंदर्यवती नर्मदा' या जगद्विख्यात ग्रंथांचे लेखक अमृतलाल वेगड यांचे चरित्रदर्शन होते. अमृतलाल वेगड पेशाने शिक्षक. त्यांच्या लिखाणाविषयी लेखक सुनील पांडे लिहितात, "चांगल्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे ती पुस्तके आपल्याला विचार करायला भाग पाडतात. आपला दृष्टीकोन बदलतात. आपण वाचन का करतो? फक्त मनोरंजन म्हणून?... तर ह्याचं उत्तर म्हणजे जे पुस्तक आपल्याला एक नवी दृष्टी देते. आपल्या अनुभवाच्या कक्षा रूंदावते. आपल्या मनात एक चिमुकली पणती तेववून जाते... अशी पुस्तके हे खरे साहित्य." अमृतलाल वेगड यांनी लिहिलेल्या पुस्तकांचे मराठी अनुवाद करणार्या मिनल फडणीस यांचे व्यक्तीचित्रही मोठे मनोहारी पद्धतीने रेखाटलेले आहे. मुळात लेखिका किंवा अनुवादक नसणार्या मिनल यांना 'सौंदर्य की नदी नर्मदा' हे पुस्तक इतके आवडले की, त्यांनी थेट अमृतलाल वेगड यांना पत्र पाठवून त्याचा मराठी अनुवाद करण्याची परवानगी मागितली. ती अर्थातच मिळाली आणि मराठी साहित्यात एका महत्वाच्या विषयावरच्या उत्तम पुस्तकाची भर पडली. 'नर्मदा परिक्रमा एक अंतर्यात्रा' या ग्रंथाच्या लेखिका महाराष्ट्रकन्या भारती ठाकूर यांचे चरित्रचित्रणही प्रेरणादायी आहे. नर्मदेच्या किनाच्याचे सौंदर्य आणि संस्कृती पाहण्यासाठी गेलेल्या भारती ठाकूर आपली केंद्र सरकारची नोकरी आणि घरदार सोडून नर्मदाकिनारी मंडलेश्वर येथेच राहिल्या. तिथे आज १४०० शालाबाह्य मुलांसाठी 'नर्मदालय' नावाने शाळा चालवतात. आपल्याच स्वार्थाच्या वर्तुळात जीवनभर फिरणार्या तुम्हा-आम्हा वाचकांसाठी हे विलक्षण प्रेरणादायी आहे.

दिवसातून तीन वेळा फक्त तीन ओंजळी पाणी घेऊन, अनवाणी पायाने तीन-तीन नर्मदा परिक्रमा करणार्या माई कुंटेंबद्दल वाचताना आपल्याला आपल्या खुजेपणाची प्रकर्षाने जाणीव होते. त्यांना अश्वत्थाम्याचे दर्शन झाल्याचेही सुनील पांडे लिहितात. बडोद्याजवळच्या चंदनाचा पाऊस पडणार्या जागेविषयी वाचताना आपली मती गुंग होते. तेरा कोटी जपानुष्ठान करणार्या सद्गुरू श्री श्रीराम महाराजांविषयाचा लेखही वाचनीय आहे. सद्गुरूंच्या आज्ञेशिवाय मी काही लिहिणार नाही, असे म्हणणारे प्रतापे महाराज मनाला भावतात. सुरूवातीला परिक्रमावासियांना लुटण्यासाठी भिल्लांना मदत करणारे हिरालाल रावत, आता नर्मदा परिक्रमा करणार्यांची सेवा करताहेत. त्यांचे मन:परिवर्तन वाचायला मजा येते.

अन्नपुर्णा प्रसन्न असतानाही आपल्या सिद्धी जनलोकांपासून झाकून ठेवणारे लखनगिरी महाराज आभाळाएवढ्या उंचीचे वाटतात. प्रतिभा चितळे आणि सुधीर चितळे हे दांपत्य वर्षाला किमान तीन हजार परिक्रमावासियांच्या भोजन आणि मुक्कामाची व्यवस्था करतात. हे सगळं कुठपर्यंत चालणार असं विचारल्यावर ते म्हणतात, "जवळचा पैसा आणि अंगातलं बळ यापैकी काहीही संपलं की, तिथं थांबायचं." तुम्ही कितीही पैसे दिलेत, तरी फक्त दहाच रूपये घेणारे सियाराम बाबा मनात घर करतात. सरकारने दिलेले दोन कोटी पंचावन्न लाख रूपये आदिवासींच्या विकासासाठी दान करणारे सियाराम बाबा जगातले सर्वांत श्रीमंत व्यक्ती वाटतात.

इव्हेंट मॅनेजमेंटच्या क्षेत्रात विश्वभर 'बिझनेस वुमन' म्हणून लौकिक असताना, नदी स्वच्छतेबद्दल लोकांना जागरूक करणार्या वॉटर वूमन क्षिप्रा पाठक. त्यांच्यावरील लेखातील दोनतीन वाक्ये देण्याचा मोह होतो आहे. "दिवसातील २४ तासांपैकी एक तास तरी आपण देवासाठी द्यायला हवा. तरूण पिढी आपल्या फॅशन, करियर आणि कपड्यांबद्दल जितकी जागरूक आहे,

# बालहक्काची पायमल्ली होताहे, त्याचे काय?

(राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग स्थापना दिन विशेष.)

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम- २००५ या कायद्याअंतर्गत दि.५ मार्च २००७ साली राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग म्हणजेच एनसीपीसीआर अर्थात नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड राईट्स याची स्थापन करण्यात आली. हा आयोग महिला व बाल विकास मंत्रालयांतर्गत कार्यरत आहे. या आयोगाशी समांतर संपूर्ण देशात आरटीई- राइट टू एज्युकेशन ॲक्ट- २००९ लागू करण्यात आला आहे. त्यात ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीने शिक्षण दिले जावे, अशी तरतूद केली आहे, मात्र क्रमिक पुस्तकें व गणवेश एसटी आणि एससी जात संवर्गातील मुलांनाच दिले जातात. इतर मागास व बिगर मागास संवर्गातील मुलांना वगळून वंचित ठेवले जात आहे. मग कुठे गेला बालहक्क कायदा? असा सवाल करण्यास जनतेला भाग पाडले जात आहे, हे या आयोगापुढे खरे आव्हान म्हणावे लागेल. याविषयीची अभ्यासपूर्ण सखोल माहिती अलककार- श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी यांच्या शब्दशैलीतून... संपादक.

आयोगाच्या या कार्य स्वरूपात अधिनियमाचे निर्धारित प्रकार- अ) मुलांसाठीच्या संरक्षण कायद्यातल्या कुठल्याही सुरक्षा उपायांची पडताळणी आणि त्याच्या फेर तपासणीसाठी आणि प्रभावी कार्यान्वयासाठीचे उपाय सुचविणे आणि केंद्र सरकार समोर ते सादर करण्यासाठी आणि या कामांवर लक्ष ठेवण्यासाठीचे सुरक्षा उपाय; आ) आतंकवाद, हिंसा, दंगे, प्राकृतिक आपदा, घरेलू हिंसा, एचआईवी- एड्स, चोऱ्या, दुर्व्यवहार, यातना आणि शोषण, वेश्यावृत्ती आणि अश्लील साहित्य अशा गोष्टी ज्यामुळे मुलांचे जीवन प्रभावित होते, आदी कारणांचा आभ्यास करणे व त्यावर उपाय शोधणे; इ) मुलांच्या जीवनात येणाऱ्या संकटांसंबंधीत असलेल्या गोष्टींमध्ये लक्ष घालणे व संकटात सापडलेली, परिवारांपासून हरवलेली किंवा परिवारविहीन मुले आणि तुरुंगात असलेली मुले यांच्या पुनर्वसनाचे काही उपाय शोधणे; ई) समाजाच्या विभिन्न विभागांतील मुलांच्या अधिकारांचा व साक्षरतेचा प्रचार करणे आणि त्यांच्यासाठी असलेल्या या अधिकारांच्या सुरक्षा उपायांची त्यांना जाणीव करुन देणे; उ) केंद्र सरकार किंवा कुठलेही राज्य सरकार किंवा इतर आधिकारांच्याअधिपत्या खाली येणारी बाल सुधारगृहे, कुठलीही शैक्षणिक संस्था यांवर लक्ष ठेवणे, त्यावर लक्ष ठेवण्याची कारणे शोधणे किंवा मुलांच्या कोणत्याही राहण्याच्या ठिकाणांवर लक्ष ठेवणे; जेथे मुलांना सुधारण्यासाठी किंवा संरक्षणासाठी ठेवून घेतले जाते. ऊ) मुलांच्या अधिकारांच्या उल्लंघनाची चौकशी आणि अशा मामल्यांमधील कार्यवाही सुरू करण्याचे उपाय आणि स्वप्रेरणेशी संबंधित मामल्यांची सूचना. ए) मुलांना अधिकारांपासून वंचित आणि त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन. ऐ) मुलांच्या संरक्षण आणि विकासाच्या कायद्यांचे गैरप्रकार. ओ) गैरनीती निर्णयांची मते, दिशानिर्देश, त्याबद्दलची मते, मुलांच्या विकासाची हमी आणि अशा मुलांची सोडवणूक. औ) अशा मामल्यांना योग्य अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवणे अथवा मांडणे. अं) येणाऱ्या संधींचा आभ्यास करण्यासाठी, अन्य अंतरराष्ट्रीय उपकरणे आणि अस्थित्वात असणाऱ्या योजनांचे वेळोवेळी फेरविचार करण्यासाठी, मुलांच्या हक्कावर अधारित इतर घडामोडी, मुलांच्या हिताकरीता व त्यांच्या विकासात मदत देण्यासाठी; अः) मुलांच्या हक्काच्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांचा, योजनांचा अभ्यास करणे व त्या व्यवहारांचे अनुपालन करणे. मुलांवर अधारीत असलेल्या योजनांच्या कोणत्याही मुद्द्यांवर चौकशी करणे, त्यावर आलेख तयार करणे आणि मुलांच्या हक्काच्या बाल अधिकार कायद्यावर टिपण्णी करणे; क) मुलांच्या कामावर गंभीरतेने विचार करणे, मुलांसाठी काम करणाऱ्या संस्था व सरकारी खाते यांना पाठींबा देणे; ख) मुलांच्या अधिकारांबद्दल सुक्ष्मज्ञान किंवा सर्व माहितीचा प्रसार करणे; ग) मुलांच्या महितीचे संकलन व चौकशी करणे; घ) मुलांच्या हक्कांची माहिती शाळांच्या आभ्यासक्रमांमध्ये, शिक्षक प्रशिक्षणांमध्ये आणि मुलांच्या व्यक्तिगत शिक्षणामध्ये प्रसारित करणे; असे आहेत.

आयोगाच्या संरचनेत ३ वर्षांच्या कालावधीसाठी केंद्र सरकारद्वारे खालील सभासदांचा समावेश करण्यात येतो- १) अध्यक्ष, जो प्रसिद्ध असेल आणि मुलांच्या विकासासाठी खास काही काम केलेले असेल. २) शिक्षणक्षेत्रात, मुलांचे आरोग्य, विकास, किशोर न्याय, टाकलेल्या वा दुरावलेल्या मुलांबद्दल काळजी असणारे, दिव्यांग- अपंग, बाल कामगार, बाल मनोविज्ञान आणि मुलांसाठीचे कायदे जाणणारे, याबाबत अनुभव, प्रसिद्धी, अखंडता, स्थैर्य आणि क्षमता असलेले ६ सभासद असतील. ३) सचिवालय सदस्य, जो संयुक्त सचिवाच्या खालोखाल नसेल. ४) वयोमर्यादा ही अध्यक्ष यांसाठी ६५ वर्षे तर सदस्यांसाठी ६० वर्षे आहे. ५) पुनर्नियुक्ती दोन पेक्षा जास्त वेळा नियुक्ती करता येत नाही. या आयोगाला खालील सर्व सिव्हील कोर्टाचे आणि खासकरून पुढील मुद्द्यांवर आधारीत हक्क असतील: अ) भारताच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तिवर शपथ लादणे आणि ती लागू करणे; आ) कोणत्याही दस्ताऐवजांचा शोध व त्याचे उत्पादन; इ) कायदेशीर बाबी व साक्षींची मागणी करणे; ई) कोणत्याही सार्वजनिक माहितीची किंवा कोणत्याही कायदेशीर कार्यालयातून प्रतिंची मागणी; उ) आयोगाच्या दस्ताऐवजांच्या पाहणीसाठी साक्षीदार नेमणे, हे आहेत.

आयोगाच्या मुख्य आधिकाऱ्यांमधून एक अधिकारी बाल हक्काच्या तक्रारींवर चौकशी करतो. आयोगाला बाल हक्कांच्या काही गंभीर तक्रारींवर स्वतः लक्ष घालावे लागते. त्यावर परिणाम करणाऱ्या कारणांचा शोध लावावा लागतो. बाल हक्काबद्दल त्यांना आनंदाने प्राप्त करवून दिली पाहिजे. १) संविधानाच्या ८व्या सूचिप्रमाणे तक्रारी या आयोगाकडे कोणत्याही भाषेत दिल्या जाऊ शकतात. २) अशा तक्रारींवर कोणतेही दर आकारले जाऊ नये.३) तक्ररीच्या कारणाचे स्वरुप स्पष्ट व कारणाचे संपूर्ण स्पष्टकरण केलेले असावे. ४) आयोग पुढील माहिती किंवा शपथपत्र गरज भासल्यास काढू शकते. तक्रार करतांना कृपया तक्रारीत खालील बाबी आल्या आहेत ना याची खात्री करुन घ्यावी: तक्रार स्वच्छ आणि सुपाठ्य असावी, तक्रार अस्पष्ट, अनाम आणि खुप नांवांची नसावी. अशा प्रकारच्या तक्रींवर कोणतीही फी आकारली जाऊ नये. नमूद केलेला मुद्दा हा कोणत्याही नागरिक विवादाशी जसे जमीन-जुमला हक्क, संविदागत दायित्व यांच्याशी संबंधीत नसावा. नमूद केलेला मुद्दा सेवांशी संबंधीत नसावा. तक्रारींचा मुद्दा कोणत्याही अन्य आयोगासमोर आधी मांडलेला नको किंवा तो कोणत्याही आयोगात, कायद्यात, कोर्टात वा आधिकरणात अडकलेला नसावा. आयोगाच्या वतीने मुद्दा अजून सिद्ध झालेला नसावा. आयोगाच्या आवाक्याबाहेर किंवा काही इतर कारणास्तव आवाक्याबाहेर गेलेला मुद्दा असता कामा नये.

आयोगाची कार्ये- बाल हक्क संरक्षणासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांतर्गत उपलब्ध संरक्षणाची तपासणी, परीक्षण करणे व त्यांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शिफारशी करणे. लहान मुलांना हक्काचा उपभोग घेण्यापासून रोखणाऱ्या कारणांची तपासणी करणे व त्याबाबत योग्य उपाययोजना सुचवणे. बाल हक्कांबाबत जागृती घडवून आणणे. बालसुधार गृहांची तपासणी करणे व गरज असल्यास संबंधित अधिकाऱ्यांना उपाय सुचविणे. बाल हक्क उल्लंघनाच्या घटनांची चौकशी करणे आणि संबंधित अधिकाऱ्यांना कारवाई सुरू करण्याची शिफारस करणे. आदी सांगता येतील. बालहक्क संरक्षण आयोग स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे. महाराष्ट्र बालहक्क संरक्षण आयोगाची स्थापना जुलै २००७मध्ये झाली.

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम- २००५ या कायद्याअंतर्गत दि.५ मार्च २००७ साली राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग म्हणजेच एनसीपीसीआर अर्थात नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड राईट्स याची स्थापन करण्यात आली. हा आयोग महिला व बाल विकास मंत्रालयांतर्गत कार्यरत आहे. या आयोगाशी समांतर संपूर्ण देशात आरटीई- राईट टू एज्युकेशन ॲक्ट- २००९ लागू करण्यात आला आहे. त्यात ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीने शिक्षण दिले जावे, अशी तरतूद केली आहे, मात्र क्रमिक पुस्तकें व गणवेश एसटी आणि एससी जात संवर्गातील मुलांनाच दिले जातात. इतर मागास व बिगर मागास संवर्गातील मुलांना वगळून वंचित ठेवले जात आहे. मग कुठे गेला बालहक्क कायदा? असा सवाल करण्यास जनतेला भाग पाडले जात आहे, हे आज या आयोगापुढे खरे आव्हान म्हणावे लागेल.

!! राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोग चिरायू होवो !!

**श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली**
**फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.**

# गुणरत्न सदावर्ते निवणूकीच्या रिंगणात?या दोन नेत्यांविरूद्ध डंके की चोट पे निवडणूक लढवेल

**दैनिक वादळ वार्ता**

आगामी निवडणूकांआधी जागावाटपावरून महायुती आणि मविआकांचं बैठकांचं सत्र सुरू आहे. काही जागांवरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षा आपापसात चर्चा करत आहे. लोकसभा निवडणूका झाल्यावर विधानसभा निवडणूकाही आहेत. त्यामुळे राजकीय समीकरण कशी आणि किती बदलतात आणि कोणाचं तिकीट कापलं जाणार आणि कोणाचं तिकीट फायनल होणार याकडे सर्वांच लक्ष लागलं लागलं आहे. अशातच प्रसिद्ध वकील गुणरत्न सदावर्ते यांनीसुद्धा निवडणूकीच्या रिंगणात उतरण्याचे



संकेत दिले आहेत. गुणरत्न सदावर्ते यांनी महाराष्ट्रातील दोन नेत्यांची नावे घेतली आहे. ज्यांच्यविरूद्ध ते निवडणूक लढवण्यासाठी तयार असल्याचं म्हटलं आहे. हे नेते दुसरे तिसरे कोणी नसून माजी मुख्यमंत्री आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, त्याचेच सुपुत्र आदित्य ठाकरे आहेत. दोघांविरूद्ध निवडणूक लढवली तर पाणीपत करून सोडणार असल्याचं सदावर्ते यांनी म्हटलं आहे चुकीचा विचारांच्या सोबत जाणारे उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे अशा लोकांविरुद्ध निवडणूक लढवायची वेळ आली हिंदुत्ववादी पक्षाकडून नक्की डंके की चोट पे लढवेल. त्यांचं पाणीपत करून सोडेल, असं गुणरत्न सदावर्ते यांनी सांगितलं.

# दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेत मूकबधिर प्रवर्गात मानव विकास मूकबधिर विद्यालयास विजेतेपद



वादळवार्ता/अंबाजोगाई

जिल्हास्तरीय दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेत मूकबधिर प्रवर्गात मानव विकास मूकबधिर विद्यालयास सर्व साधारण विजेतेपद प्राप्त झाले आहे. जिल्हास्तरीय दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेत मानव विकास मूकबधिर विद्यालयातील उत्स्फूर्त सहभाग नोंदवून मूकबधिर प्रवर्गात जिल्हास्तरीय सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. त्यात विद्यार्थी नंदिनी संतोष अग्रवाल गोळाफेक, स्वप्नील अशोक सूर्यवंशी २०० मी. धावणे व लांबउडी, ओम मारोती ठाकरे ४०० मी. धावणे, गणेश शिंदे ४०० मी. धावणे व लांबउडी, अजय राठोड – २०० मी. धावणे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. रेहान उस्मान खुरेशी १०० मी. धावणे, संस्कार जितेंद्र कांबळे लांबउडी, सुरज माने गोळाफेक यांनी तृतीय क्रमांक पटकावला. मानव विकास मूकबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपले क्रीडा कौशल्य दाखवून प्रथम क्रमांकाची ०७, तृतीय क्रमांकाची ०३ पारितोषीके पटकावून घवघवीत यश संपादन करीत मूकबधिर प्रवर्गात जिल्हास्तरी दिव्यांगाच्या क्रीडा स्पर्धेत अजिंक्यपद पटकावले.

# घड्याळ चिन्हावरून जितेंद्र आव्हाडांचा अजित पवार गटाला टोला

**वादळवार्ता/**

अजित पवार यांनी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर राष्ट्रवादी पक्षावर आणि घड्याळ चिन्हावर त्यांनी दावा सांगितला. केंद्रीय निवडणूक आयोगाने अजित पवार गटाच्या बाजूने याबाबतचा निर्णय दिला. आता आज ठाण्यात बोलताना त्यावरून राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड टोला लगावला आहे. जितेंद्र आव्हाड यांच्या कळवा-मुंब्रा मतदार संघात एका कार्यक्रमात बोलताना घड्याळ या निशाणीवरून त्यांनी अजित पवार गटाला चोर म्हणत टीका केली.अजित पवार गटाला टोला आमचं घड्याळ चोरलं गेलं आहे. आता आमची निशाणी तुतारी आहे. लक्षात ठेवा कोण एक धोकेबाज या विभागात कामच केलं नाही. तो ही घड्याळ घेऊन प्रचार करेल. मात्र तुम्ही हा नका विचार करू की ही जितेंद्र आव्हाड यांची घडी आहे. ही माझा हातातून चोरली गेलेली घडी आहे. तुम्ही त्या घड्याळाची वाट पाहू नका. त्या घडीचा वेळ बदललेला आहे. त्या घड्याळाची वेळ आता 4-20 आहे, असा टोला जितेंद्र आव्हाड यांनी आधी घड्याळाची वेळ 10-10 होती. आता 4-20 झाला आहे चोरट्यांनी पाकीट मारला आणि माझी घडी काढून घेतली. त्यानंतर माझी निशाणी आता तुतारी आहे.. तुतारी ही निशाणी आपली आहे. आतापासून लक्षात ठेवा



लगावला आहे.

आता तुतारीकडे लक्ष द्या- आव्हाड

की जितेंद्र आव्हाड यांची निशाणी म्हणजे तुतारी... नागरिकांनी एकच आवाज करत तुतारी शब्द उच्चार करत एकच घोषणा केली. लग्नात देखील तुतारी वाजवली जाते, असं म्हणत आव्हाडांनी तुतारीकडे लक्ष वेधत तुतारी वाजवायला सांगितलं.

“यांनी घड्याळ चोरलं!”युद्धात देखील सैनिक जातात तेव्हा देखील तुतारी वाजवली जाते. राम जेव्हा वनवासात गेले होते त्या दरम्यान आणि अयोध्येत परत आले तेव्हा देखील तुतारी वाजवली गेली होती. हे चोर आमची घडी घेऊन गेले. पाकीट मार हे सर्व आहेत. आता घडीला वोट द्या, म्हणून तुमच्याजवळ येतील. पण त्यांना तुम्ही प्रश्न विचारा. मतदान करताना दोनदा विचार करा, असं आव्हाड म्हणाले. तुम्ही जितेंद्र आव्हाड यांची घडी चोरली आता आम्ही त्या चोरांना वोट देणार नाही. आता कोणाला वोट देणार? तुतारीला..., असं आव्हाड म्हणाले.

# धारूर शहर व तालूक्यात पल्स पोलीओ लसीकरणास उत्स्फूर्त प्रतिसाद.

वादळवार्ता/किल्लेधारूर

आरोग्य विभागाच्या वतीने आयोजीत पल्स पोलीओ लसीकरण मोहीमेस धारूर तालूक्यात उस्फुर्त प्रतिसाद मिळाला यामध्ये शहरी बूथ १२, ग्रामीण १०७ असे एकून ११९ बुथ होते तर लाभार्थी मध्ये ग्रामीण ८१५४ शहरी २१४५ एकून १०२९९ होते ,दुपार पर्यंत ७००० पेक्षा जास्त बालकाचे पल्स



पोलीओ लसीकरण झाले होते. आरोग्य विभागाबरोबर सामाजीक संस्था एन सी सी, एन एस एस विद्यार्थी या उपक्रम यशस्वी करण्या साठी परीश्रम घेत होते. ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ प्रसाद कुलकर्णी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ शहाजी लोमटे ,डॉ.श्रद्धा लातूरकर , औषध निर्माता शेख नासेर सह कर्मचारी मोहीम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत होते.

# परळीत येत्या काही महिन्यांतच सुसज्ज क्रीडा संकुल उभारणार - धनंजय मुंडे

## धनंजय मुंडेंसह भारताचे स्टार क्रिकेटर युवराज सिंह, झहीर खान यांच्या उपस्थितीत नामदार चषकाचे बक्षीस वितरण संपन्न

## ग्रामीण मधून चांदापुर तर परळी शहरातून जय श्री राम संघ ठरले नामदार चषकाचे मानकरी!

**वारळवार्ता/परळी वैद्यनाथ**

परळीची माती ही रत्नांची खाण आहे या मातीने महाराष्ट्र व देशाला अनेक क्षेत्रात विविध रत्ने दिली आहेत. क्रिकेट सह क्रीडा क्षेत्रातही परळीचे मोठे योगदान आहे. रणजी ट्रॉफीसाठी मराठवाड्याची स्वतंत्र टीम असली असती, तर परळी सह बीड जिल्ह्यातील अनेक खेळाडूंना त्याद्वारे आपली प्रतिभा राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर सादर करण्याची संधी मिळाली असती; ती संधी मिळावी म्हणून दरवर्षी नाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून आपण क्रिकेट व अन्य क्रीडा स्पर्धांचे आयोजन करतो. याही वर्षी आपण वैद्यनाथ महाविद्यालयासमोरील या मैदानावर नामदार चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन केले, परंतु पुढील वर्षी ही स्पर्धा स्वतंत्र भव्य स्टेडियम मध्ये होईल; यासाठी राज्य शासनाने सुमारे ६५ कोटी रुपये निधी देण्याचे मान्य केले असून परळीत येत्या काही महिन्यातच सुसज्ज असे क्रीडा संकुल उभे केले जाईल. त्यामध्ये क्रिकेटसह अन्य क्रीडा प्रकारातील खेळांनाही सुसज्ज असे मैदान उभे करून देण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे कृषिमंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी येथे बोलताना केली.

ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने परळी वैद्यनाथ येथे मागील २५ जानेवारीपासून भव्य टेनिस बॉल डे-नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये परळी शहर तसेच मतदार संघातील ग्रामीण भागातील २६४ क्रिकेट संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा अंतिम सामना आज हजारो क्रिकेट प्रेमींच्या उत्साहात खेळवला गेला व त्यानंतर आयोजित बक्षीस वितरण समारंभात धनंजय मुंडे बोलत होते. या समारंभास खास भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज युवराज सिंग तसेच बॉलिंग ची स्पीड मशीन म्हणून ओळख असलेला स्टार गोलंदाज जहीर खान यांची विशेष उपस्थिती होती. दोघांचेही नाथ प्रतिष्ठानच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी स्थानिक तरुणांनी एकच जल्लोष करत आपल्या लाडक्या खेळाडूंचे जोरदार स्वागत केले.

आपल्या शरीरात वाढत असलेल्या कॅन्सरवर मात करून युवराज सिंग ने देशासाठी अनेक रेकॉर्ड स्थापित केले युवराज सिंग आज प्रथमच परळीत आले असता वैद्यनाथ असलेल्या प्रभू वैद्यनाथांच्या चरणी युवराज सिंग यांना उदंड आयुष्य लाभो अशी प्रार्थना करत असल्याचेही धनंजय मुंडे यावेळी बोलताना म्हणाले. मी देखील ग्रामीण भागातून टेनिस बॉल पासून क्रिकेट खेळण्याची सुरुवात केली. हळूहळू संधी उपलब्ध होत गेली आणि देशासाठी खेळायची मला संधी मिळाली. ग्रामीण भागाच्या मातीतूनच योग्य वेळी योग्य संधी मिळाल्याने मोठे खेळाडू निर्माण होत असतात. त्यामुळे माझे मित्र धनंजय मुंडे यांच्यासारख्या नेत्यांनी स्थानिक प्रतिभावान खेळाडूंना योग्य मंच उपलब्ध करून दिल्यानेच ग्रामीण मातीतून युवराज सिंग आणि झहीर खान सारखे खेळाडू घडत असतात असे गौरव उद्गार भारताचे माजी क्रिकेटपटू युवराज सिंग यांनी काढले.

मी अहमदनगर जिल्ह्याच्या श्रीरामपूर





मधून टेनिस बॉल पासूनच सुरुवात केली आणि पुढे खेळत गेलो. आज परळीत येऊन ग्रामीण भागात क्रिकेटचे एवढे भव्य आयोजन पाहून मला अतिशय आनंद झाला. परळीत खेळले जाणारे हे क्रिकेट एक दिवस देशात आणि देशाबाहेर नक्कीच पोहोचेल, असा मला विश्वास आहे, असे मत यावेळी भूतपूर्व भारतीय क्रिकेटर जहीर खान यांनी व्यक्त केले.

गेल्या २५ जानेवारीपासून परळी वैद्यनाथ शहरात धनंजय मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या नामदार चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून तब्बल ३५०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. ही माझ्यासाठी संयोजक म्हणून खूप मोठी बाब आहे, तसेच या भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यामध्ये मला अनेकांचे सहभागी लाभले त्या सगळ्यांचेच मी या माध्यमातून आभार मानतो, असे मत यावेळी संयोजकांच्या वतीने जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे यांनी आपल्या प्रास्ताविकात मांडले.

दरम्यान नामदार चषक क्रिकेट स्पर्धेमध्ये ग्रामीण व शहर असे दोन वेगवेगळे फायनल खेळवण्यात आले. ग्रामीण मध्ये चांदापूर हा संघ विजेता तर शिवबा गोपीनाथ गड हा संघ उपविजेता ठरला तसेच शहर मध्ये जय श्रीराम संघ विजेता तर जे के सी सी हा संघ उपविजेता ठरला. विजेत्या संघास एक लाख रुपये व ट्रॉफी तसेच उपविजेत्या संघास ५१ हजार रुपये व ट्रॉफी असे बक्षीस ना.धनंजय मुंडे, युवराज सिंह, झहीर खान यांसह मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. या समारंभास ना. धनंजय मुंडे यांच्यासह भूतपूर्व भारतीय क्रिकेटर युवराज सिंह, भूतपूर्व भारतीय क्रिकेटर जहीर खान, जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार, परळीचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, अंबाजोगाई चे तालुकाध्यक्ष तानाजी देशमुख, युवा नेते अभय मुंडे, सूर्यभान नाना मुंडे, प्रा. मधुकर आघाव, यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या समारंभात प्लेअर ऑफ द सिरीज, मॅन ऑफ द मॅच, बॅटिंग, बोलींग, अंपायर आदी सर्वांचाच सन्मान करण्यात आला. आयोजकांच्या वतीने ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अभय मुंडे, व्यंकटेश मुंडे, सुशील कराड, नाथ प्रतिष्ठानचे सचिव नितीन मामा कुलकर्णी, प्रणव परळीकर, अविनाश गवळी, प्रा. अजय जोशी, शेख मुसा, सय्यद मुस्तफा, उमेश नागरगोजे, बालाजी वाघ, विष्णू गीते, सुरेश गीते, बिलाल हुसेन, हाजी बाबा यांसह आदींनी परिश्रम घेतले.

पुढील वर्षी मतदारसंघातील ७०० खेळाडूंची निवड करून परळी प्रीमियर लीग आयोजित करणार - धनंजय मुंडे

यावर्षी या स्पर्धेच्या माध्यमातून सुमारे साडेतीन हजार खेळाडूंनी क्रिकेटचा आनंद लुटला. यापैकी परळी मतदारसंघातल्या उत्कृष्ट खेळ दाखवलेल्या ७०० खेळाडूंची निवड करून २० संघांच्या माध्यमातून या खेळाडूंचा लिलाव करून पुढील वर्षी परळी प्रीमियर लीग या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन याहीपेक्षा भव्य स्वरूपात करणार असल्याचीही घोषणा धनंजय मुंडे यांनी यावेळी केली.

# राज्यस्तरीय नाटयस्पर्धेत श्रावणी निर्मळेलाद्वितीय पारितोषिक

**वादळवार्ता/अंबाजोगाई**

राज्यस्तरीय नामांकित फिरोदिया करंडक राज्यस्तरीय नाटय स्पर्धेत उत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री म्हणून श्रावणी निर्मळेच्या अभिनयाला व्दितीय पारितोषिक मिळाले . येथील मूळ रहिवासी आणि पुण्याच्या विश्वकर्मा अभियांत्रिकी महाविद्यालयाची विद्यार्थीनी श्रावणी शिवकुमार निर्मळे हिला घवघवीत यश मिळाल्यामुळे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे . पुणे येथील साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे नाटय गृहात आयोजित फिरोदिया करंडक राज्यस्तरीय नाटय स्पर्धेत पुण्याच्या विश्वकर्मा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने “ पाऊल खुणा “ ही भावस्पर्शी एकांकिका सादर करण्यात आली . त्यात श्रावणी निर्मळे हिने ग्रामिण भागातील महिलेचे पात्र सादर केले . यापूर्वी श्रावणीने विविध वक्तृत्व स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, साहित्य निर्मीती स्पर्धेत यश संपादन केले होते. तिला दिग्दर्शक वेदांत कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले . प्राचार्य डॉ .राजेश जालनेकर व इतरांनी तिचे अभिनंदन केले .



# अखेर रमाई घरकुल योजनेला अंबाजोगाई सुरुवात, लवकरच ३००० घरकुल मंजूर होणार

## २५ वर्षानंतर ५४ घरकुलांना मंजुरी सर्व स्तरातून कौतुक - आयुब पठाण

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड/बालाजी जगतकर**

परळी, बीड मजालगाव, केज,नंतर अंबाजोगाई नगरपरिषद हद्दीतील अनुसूचित जाती व बौद्ध समाजातील लाभार्थ्यांना सन २०११ पासून समाज कल्याण विभागामार्फत चालू असलेल्या रमाई घरकुल योजनेचा प्रथमच मोठ्या प्रमाणात ५४ लाभार्थ्यांना घरकुल मंजुर झाले आहे. परळी नगर पालिकेने ज्या पद्धतीने भोगवट दारातला पीटीआर देऊन घरकुल योजना लागू करून घेतली त्याच धर्तीवर बिलकॉन कन्सल्टन्सी चे संचालक आयुब पठाण चर्चा घडवून आणली योग्य असे मार्गदर्शन केले त्यानंतर अंबाजोगाई येथे प्रयोग करण्यात आला.



यासाठी नगरपरिषद अंबाजोगाईचे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी डॉ.उत्कर्ष गुट्टे यांच्या प्रयत्नांतून व विभाग प्रमुख करडे स्थापत्य अभियंता, अधिक्षक सय्यद अन्वर साहेब, प्रसिद्ध प्रकल्प सल्लागार बिल्कॉन कन्सल्टन्सीचे संचालक अय्युब खान पठाण व सर्व टिम यांच्या अथक प्रयत्नातून अंबाजोगाई शहरात प्रथम ५४ लाभार्थ्यांना रमाई घरकुल मंजूर झाले असून या मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी सुद्धा पूढील वर्षासाठी २५०० रमाई घरकुल मंजूरीसाठी शासनाला पत्र दिले आहे. याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. अंबाजोगाई शहरात २५ वर्षानंतर ५४ घरकुल मंजुर झाले आहेत.यामुळे अंबाजोगाई नगरपरिषद हद्दीतील अनुसूचित जाती व नवबौद्धध घटकातील लाभार्थ्यांना मध्ये आनंदाचे वातावरण झाले आहे. यासाठी वंचित बहुजन आघाडीचे अंबाजोगाई पदाधिकारी



कार्यकर्ते यांनी अनेक वेळा आंदोलन केली आहे. त्याचे फलित म्हणून भोगवटदरांना घरकुले मंजूर झाली आहे. या कामी बिलकॉन कन्सल्टन्सी चे संचालक आयुब पठाण यांनी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले आहे. त्याच्या या कामाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक
# वादळ वार्ता
संपादक ; अजय भांगे मो . ९४२२६६००७७

# माँ साहेब जिजाऊ रत्न जिल्हा स्तरीय पुरस्काराचे होणार आज वितरण

## मनोज जरांगे पाटील,आ.रोहित पवार, प्रकाश सोळंके, संदीप क्षीरसागरांची उपस्थिती




### सोहळ्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे निर्भीड पत्रकार संघाचे आवाहन

**माजलगाव(प्रतिनिधी)** दरवर्षीप्रमाणे यावर्षी ही जिजाऊ रत्न जिल्हास्तरीय पुरस्काराचे वितरण चार मार्च सोमवार रोजी वैष्णवी मंगल कार्यालय माजलगाव येथे दोन वाजता पार पडणार असून भव्य दिव्य पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे या पुरस्कार सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील,आ.प्रकाश सोळंके, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार ) गटाचे आ. रोहित पवार, बीड तालुक्याचे लोकप्रिय आ.संदीप क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत माजलगाव तालुक्यातील जनतेने नेत्र दीपक कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे दरवर्षी मासाहेब जिजाऊ जिल्हास्तरीय पुरस्कार निर्भीड पत्रकार संघाच्या वतीने देण्यात येतात त्यानुसार यावर्षी जिजाऊ रत्न जिल्हास्तरीय पुरस्काराची घोषणा करण्यात आली होती त्यानुसार जिल्हास्तरीय पुरस्कारामध्ये सूर्योदयचे संपादक गंगाधर काळकुटे यांची निवड करण्यात आली आहे तर महिलांमधून मनसे कार्यकर्त्या वर्षा जगदाळे यांनाही मासाहेब जिजाऊ रत्न म्हणून पुरस्कार देण्यात आला आहे सदर पुरस्काराचे वितरण दिनांक 4 मार्च 2024 रोजी माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात दुपारी दोन वाजता संपन्न होत आहे कार्यक्रमासाठी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील आ. रोहित पवार प्रकाश दादा सोळंके, संदीप भैया शिरसागर, आधी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणार आहेत तर प्रमुख अतिथी म्हणून बाबुरावजी पोटभरे, बजरंग सोनवणे, रमेश रावजी आडसकर, राजेसाहेब देशमुख, अनिल जगताप, भाई गंगाभिषण थावरे, नितीन नाईकनवरे, जयंसिग सोळंके, तुळजाभवानीचे अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ धनंजय सोळंके आधी उपस्थित राहणार आहेत यावेळी मासाहेब जिजाऊ रत्न जिल्हास्तरीय पुरस्कार वितरणासह माजलगाव भूषण पुरस्कार चे वितरण होऊन प्रत्येक तालुक्यातील दोघांचा जिजाऊ रत्न पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे असे एकूण 31 पुरस्कार वितरित करण्यात येत असून याची डोळा याची देही आपल्या माणसाचा सन्मान पाहण्यासाठी जिल्ह्यातील जनतेने व मासाहेब जिजाऊ हितचिंतक आणि प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

# सोशल मीडियावर ब्राह्मण समाजाबद्दल अपशब्द वापरणाऱ्या संबंधित इसमावर गुन्हा दाखल करा ब्राह्मण समाजाची मागणी




**दैनिक वादळ वार्ता**
**उरण /विठ्ठल ममताबादे**
युट्युब या सोशल मीडियावर एका व्यक्तीने ब्राह्मण समाजाबद्दल अपशब्द वापरत ब्राह्मण समाजाला संपवून टाकू असे अपशब्द वापरल्या बद्दल उरण तालुका ब्राह्मण समाज तर्फे दिनांक २/३/२०२४ रोजी उरण मध्ये निषेध नोंदविण्यात आला.यु ट्यूब चॅनलवर ब्राह्मण समाजाला तीन मिनिटात संपवून टाकू असे बेताल वक्तव्य करून सामाजिक सलोखा बिघडण्यास कारणीभूत असणाऱ्या अज्ञात व्यक्तीवर कडक कारवाई करण्यात यावी या मागणीसाठी दिनांक २/३/२०२४ रोजी उरण ब्राह्मण समाजबांधवांतर्फे उरण पोलीस स्टेशनला तसेच तहसीलदार उद्धव कदम यांच्याकडे निवेदन देण्यात आले. याप्रसंगी ब्राह्मण सभा उरण ट्रस्टीचे विराम उपाध्ये, उपाध्यक्ष अनिल दाते, खजिनदार हेमंत धामणकर, सचिव वैभव राईलकर, कार्यकारिणी सदस्य धनंजय उपाध्ये तसेच महिला मंडळ कार्यकारिणी सदस्य श्रीमती नंदीनी राईलकर, श्रीमती मृणाल उपाध्ये, श्रीमती नेहा उपाध्ये,दर्शना देशमुख तसेच मोठ्या प्रमाणावर ब्राह्मण समाजबांधव उपस्थित होते.

# तुमची मुलगी असती तर..; चाहत्यावर का भडकली रिंकू राजगुरु?



नुकतंच जळगावमध्ये महासांस्कृतिक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. या महोत्सवाला विशेष पाहुणी म्हणून 'सैराट' फेम अभिनेत्री रिंकू राजगुरूने हजेरी लावली होती. रिंकूची एक झलक पाहण्यासाठी जळगावकर उत्सुक झाले होते. त्यामुळे या कार्यक्रमाला मोठी गर्दी झाली होती. कार्यक्रम संपल्यानंतर रिंकू जेव्हा बाहेर जात होती, तेव्हा काही चाहत्यांनी धक्काबुक्की केली. गर्दीतून बाहेर पडताना रिंकूलाही एका चाहत्याचा धक्का लागला. त्यामुळे रिंकू चांगलीच भडकली होती. 'या जागी तुमची मुलगी असती तर चाललं असतं का', असा प्रश्न रिंकूने त्या चाहत्याला केला. रिंकूचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर समोर आला आहे. जळगावमधील या कार्यक्रमात रिंकूने 'सैराट'मधील तिचा लोकप्रिय डायलॉगसुद्धा म्हणून दाखवला होता. विशेष म्हणजे हा डायलॉग तिने खान्देशी भाषेत म्हणून दाखवला. यावेळी चाहत्यांनी एकच कल्ला केला. कार्यक्रम संपल्यानंतर तिथून बाहेर पडताना काही चाहत्यांनी गर्दीत धक्काबुक्की केली. त्यामुळे रिंकूचा राग अनावर झाला. या सांस्कृतिक महोत्सवाचं आयोजन शासनाकडून करण्यात आलं होतं. मात्र कार्यक्रम संपल्यानंतर गर्दीवर नियंत्रण मिळवण्यास आयोजकांना काही प्रमाणात अपयश आल्याचं पहायला मिळालं.

## बनसारोळा येथे विश्वकर्मा जयंती साजरी

वादळवार्ता/केज
तालुक्यातील बनसारोळा येथे प्रभू विश्वकर्मा यांची जयंती साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त ह भ प गजानन महाराज सुवर्णकार यांचे कीर्तन संपन्न झाले. यावेळी निरूपणात महाराज सेवा कार्यातून समाधान मिळत असते सर्वांनी सतकार्यातून भक्ती करावी असे सांगितले.




जयंती निमित्त प्रतिमेचे , मूर्तीचे भव्य पूजन करण्यात आले . जयंती कार्यक्रमाचे नियोजन गणपत पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमात यशस्वीतेसाठी विश्वकर्मा प्रतिष्ठानचे अध्यक्ष शाहीर तुकाराम सुवर्णकार, उपाध्यक्ष आबा नवघन,सचिव बालासाहेब गोरमाळी,कोषाध्यक्ष खंडू पांचाळ, सदस्य सिद्धेश्वर नवघन,प्रकाश सुवर्णकार,प्रशांत डोरले,हरिशचंद्र पाचनकर,अशोक पांचाळ,बाळासाहेब खोगरे,बाळासाहेब लोकरे, आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमास गावातील व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## केजच्या "बचपन बालविद्या मंदिर" चे स्नेहसंमेलन

वादळवार्ता/केज
शहरातील धारूर रोड लगतच्या 'बचपन बालविद्या मंदिर' चे स्नेहसंमेलन शनिवारी येथील मुक्ताई फंक्शन हॉल मध्ये पार पडले. यावेळी कार्यक्रमाच्या उदघाटनप्रसंगी केजच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड, सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले, पत्रकार हनुमंत सौदागर, नगरसेविका आशाताई कराड व वर्षा राख यांची उपस्थिती होती.



सीताताई बनसोड यांनी शाळेच्या उपक्रमाचे कौतुक करून शाळेच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. हनुमंत भोसले यांनी पालकांनी मुलांच्या भविष्याबद्दल निर्णय घेताना योग्य विचार करण्याचा सल्ला दिला. मुलांना त्यांच्या आवडीनुसार क्षेत्र निवडू द्या असे आवाहनही त्यांनी केले. पत्रकार हनुमंत सौदागर यांनीही आमची मुले उद्याच्या समाजात आदर्श माणूस बनली पाहिजेत. त्यासाठी पालकांनी त्यांच्याबद्दलचे निर्णय घेताना घाई न करण्याचे आवाहन केले. उदघाटन कार्यक्रमानंतर लगेच या शाळेच्या चिमुकल्यानी विविध गुणदर्शना चे कार्यक्रम सादर केले. नृत्य व कला अभिनयाने या चिमुकल्यानी उपस्थितीतांची मने जिंकली. शाळेच्या संचालिका सौ वैशाली कराड मॅडम यांनी उपस्थितांचे स्वागत केले तर श्री विनायकराव कराड यांनी प्रास्ताविक केले. कु श्रावणी कराड हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास विद्यार्थी व पालकांची मोठी उपस्थिती होती.

# महिलांच्या आडून माझ्यावर हल्ल्याचा डाव, फडणवीस साहेब तुम्हाला सुट्टी नाही- मनोज जरांगे पाटील

**वादळवार्ता/**
मराठा आरक्षणाचे प्रमुख मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. याआधी जरांगे यांनी फडणवीस यांच्याकडून मारण्यासाठी षडयंत्र रचलं गेल्याचं म्हटलं होत. सलाईनद्वारे मला मारण्याचा गंभीर आरोप जरांगेंनी केलेला. अशातच फडणवीसांनी संभाजीनगरमध्ये महिलांच्या आडून हल्ला करण्याचा डाव केल्याचा आरोप केल आहे. काय म्हणाले मनोज जरांगे?

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुसरा हल्ल्याचा डाव रचला, असा अंदाज दिसत आहे. त्यांच्या कार्यकर्त्याकडून माझ्यावर हल्ला घडवून आणण्याच्या तयारीत आहे. मी आता बाहे पडलो आहे, मलाही पाहायचाय कोणता भाजपचा कार्यकर्ता येतो हल्ला करायला हे मला पाहायचं असल्याचं मनोज जरांगे पाटील म्हणाले.

कारण हे जर खोटं असेल तर हा प्रयोग त्यांना बहुतेक संभाजीनगरला करायचा होता. छत्रपतींचे विचार आम्हाला सांगायचे की महिलांचा आदर करायला पाहिजे आणि इकडे महिला पाठवता. १० टक्के आरक्षण स्वीकारण्यासाठी इतक्या खालच्या दर्जाला जाणं गृहमंत्र्याला शोभत नाही. तुम्हाला सट्टी नाही, तुम्ही चुकीच्या माणसाच्या नादी लागला असल्याचं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

मुख्यमंत्र्यांचे SIT चौकशीचे आदेश





मनोज जरांगे आता तीन दिवसीय दौऱ्यावर असणार आहेत. त्याआधी देवेंद्र फडणवीस यांच्यावर परत एकदा मनोज जरांगे यांनी निशाणा साधला आहे. मनोज जरांगे यांनी याआधी केलेल्या आरोपांची एसआयटी चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात केली आहे. जरागेंनी पहिल्यांदा आरोप केले तेव्हा भाजपच्या नेत्यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. इतकंच नाहीतर सुरूवातील जेव्हा अंतरावली सराटी येथे लाठीचार्ज झाला त्याआधी राजेश टोपे यांच्या कारखान्यामध्ये मराठा आंदोलक असल्याचा आरोप केला होता. यावर आता फडणवीस काय बोलतात हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरुपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )